सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-२५६५१४५/१४६,
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /२०२१/2773 दिनांक:- 08 OCT 2021

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग. नागपूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडिबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांच्या कार्यवाहीबाबत.........(मुदतवाढ)

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस/विकाना/डिबीटी पोर्टल/२०२१/२४९०/ दि. ०६/०९/२०२१

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडिबीटी पोर्टलवरील, तंत्रशिक्षण संचालनालयांमार्फत राबविण्यात येत असलेल्या शिष्यवृत्ती योजना दि. ०३/१२/२०२० पासून सुरू झालेली असुन लॉगीनमध्ये प्राप्त् होणारे पात्र विद्यार्थ्याचे अर्ज प्रलंबित न ठेवता वेळेमुदतीत मंजुरीकरिता या कार्यालयास पाठविण्यांबाबत संदर्भिय पत्रान्वये आपणांस कळविण्यांत आलेले आहे. तरी महाडिबीटी डॅशबोर्डनुसार काही संस्थांच्या लॉगीन मध्ये अद्याप अर्ज प्रलंबित असल्याचे दिसून येते.

तरी याव्दारे सर्व संस्थांना पुनःश्च सुचित करण्यात येते की, महाडिबीटी पोर्टलवर प्रदर्शित केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज (Fresh/Renewal)भरुन अंतिम करण्यासाठी व **शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी विद्यार्थ्याकडून पुन:श्च अर्ज** (Re-Apply) भरुन घेण्यासाठी व अर्ज तपासणी करिता दिनांक २०/१०/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असुन शिष्यवृत्तीस पात्र असलेले अर्ज, मुदतीपुर्वी पुढील कार्यवाही करिता पाठविण्यात यावे.

**आपणास त्रुटी अभावि रिर्वट करण्यात आलेल्या अर्जातील त्रुटीची पुर्तता न करता विद्यार्थ्याचा अर्ज संस्थेकडून मंजूर करून पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्यास, सदर अर्ज विभागीय कार्यालयामार्फत थेट नामंजूर** (Reject) **करण्यात येईल. तसेच अर्ज न भरण्याच्या किंवा इतर कारणास्तव पात्र विद्यार्थी योजनेंच्या लाभापासून वंचित राहीला अथवा संस्थेकडुन कोणतेही अर्ज तपासणीसाठी प्रलंबित राहीले तर यांची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील.**

( [illegible] )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

प्रत:-१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय ,म.रा.मुंबई, यांना माहितीकरिता सविनय सादर.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

**MahaDBT Extended Timeline** :: Application Acceptance (New/Renewal) for A.Y.2020-21 has been Extended to **20 Oct. 2021**. And Last date for Application Re-Apply of A.Y. 2019-20 is **20 Oct. 2021**

